बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३५ | बुधवार,दि. ०९ ऑगस्ट २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# बांधकाम सभापतीच्या तालुक्यात सिमेंट रस्त्यांचे निकृष्ट बांधकाम

- अभियंते व पेटी कंत्राटदारात संगनमत,रस्ता बांधकामाचे पुरवठादारही यांचेच
- मग्रारोहयो(अभिसरण)योजनेच्या सिमेंट रस्त्याची ठेकेदारी राजकीय पक्षाच्या नेत्याकंडे
- आजी माजी आमदारांच्या नावावर कार्यकर्त्या कंत्राटदारांची दादागिरी



**गोंदिया:–** जिल्हयातील सध्या मोठ्याप्रमाणात सिमेंट रस्त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे चित्र बघावयास मिळते. जिल्हा परिषदेच्या २५१५,३०५४,२४१९ आदिवासी उपाययोजना, ठक्करबापा योजनेसह, मग्रारोहयोच्या अभिसरण योजनेंतर्गत रस्ता बांधकाम हाती घेण्यात आले आहे.यातील ९० टक्के सिमेंट रस्त्याची कामे ही सुमार दर्जाची होत असून जि.प.मध्ये बसलेले काही अभियंते सुशिक्षित बेरोजगारांच्या नावावर काम घेत स्वतःच कंत्राटदारी सुरु केली आहे.विशेष म्हणजे जि.प.चे बांधकाम सभापती हे याच गोंदिया तालुक्यातील असून तेजतर्रार सभापती म्हणून ओळखले जात असले तरी त्यांच्यात तालुक्यात निकृष्ट दर्ज्याच्या सिमेंट रस्ता बांधकामाना प्रचंड जोमाणे सुरवात झालेली असतानाही त्यांचे मात्र याकडे लक्ष नसल्याने त्यांचे लक्ष कुणाकडे अशा चर्चा सुरु झाल्या आहेत.

तर दुसरीकडे गोंदियासह सर्वच तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गतच्या खडीकरण व सिमेंट रस्ता (अभिसरण)बांधकामाचे काम हे या योजनेचे कंत्राटी अभियंते स्वतःच ग्रामपंचायत सरपंचांना हाताशी धरुन करीत असल्याचे समोर आले आहे.गोंदिया तालुक्यातील अनेक गावासह गोरेगाव तालुक्यातील, कालीमाटी,बाम्हणी, सर्वाटोला, दवडीपार येथे सुध्दा झालेले काम हे कंत्राटी अभियंता असलेलल्या व्यक्तीनेच केल्याचे समोर आले आहे.गोंदिया तालुक्यात तर काही कंत्राटी अभियंत्यानी कामाचे मेजमेंटपुस्तिका तयार करण्यापासून कुठल्या दुकानातून सिमेंट आणि कोण मटेरियल पुरवठा करणार हे सर्व तयार करुन ग्रामसेवकासमोंर सरळ बिल ठेवून स्वाक्षरी करण्याचे आदेश देत असल्याचेही प्रकरण आहे.सर्व कमिशनच्या नादात सिमेंट रस्ता व खडीकरण रस्त्यांचा दर्जा खालावला जात असताना बांधकाम सभापतीसही कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंते हे मात्र मुग गिळून बसले आहेत.काही अभियंत्यानी तर चक्क १०० गावांचे कामच आपल्याकडे ठेवण्याकरीता लोकप्रतिनिधींच्या मागेपुढे ससेमिरा चालविला आहे.निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला समज देण्याऐवजी त्याची बाजू घेण्याचे काम सध्या बांधकाम विभागातील वरिष्ठापासूंन सर्वच अभियंते करीत आहेत.



या रस्ता बांधकामाची एजंसी जरी ग्रामपंचायत असली तरी सदरचे काम हे अभियंता ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना हाताशी धरुन कंत्राटदारासोबत करीत असल्याचेही गोंदिया व गोरेगाव तालुक्यात निदर्शनास आले आहे.जून महिन्यापासून पावसाला सुरवात झाली असून सिमेंटरस्ता तयार करतांना योग्य प्रकारच्या ओपीसी सिमेंटचा वापर न करता पीपीसी सिमेंटचा वापर केले जात असल्याचेही चित्र आहे. या सर्व कामाची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे.

पीपीसी सिमेंटमध्ये ७० टक्के फ्लाय अॅशचा समावेश असतो त्यामुळे रस्ता पाहिजे तसा मजबूत होत नाही. जेव्हा की सिमेंट रस्ता तयार करतांना ओपीसी सिमेंट वापरायला हवे ज्यात फक्त ३० टक्के फ्लायॅ एशचा वापर होतो. परंतु अभियंता व कंत्राटदाराच्या संगनमताने पीपीसी सिमेंटचा वापर करुन निकृष्ठ रस्ता बांधकामाची मोहीम जिल्हा परिषद व राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागासोबतच मग्रारोहयोच्यावतीने राबविली जात आहे.




गोंदिया तालुक्यातील चुलोद येथे जि.प.बांधकाम विभागाच्यावतीने २५१५ योजनेंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम करण्यात आले आहे. या बांधकाम ाला आठवडा सुध्दा व्हायला असून निकृष्ठ बांधकामामुळे आत्तापासूनच भेगा पडल्याचे व किनारही तुट्ले गेले,तरीही काम बघणारा अभियंता मात्र सवीतकृष्ठ काम असल्याची ग्वाही देत आहेत.

विशेष म्हणजे सदर रस्ता बांधकाम हे गोंदियाचे आमदारांचे समर्थक व बाजार समितीचे संचालक असलेल्या व्यक्तीने केले असून आम्ही कसेही काम केले तरी काही फरक पडत नसल्याचेही सांगायला ते विसरत नाही.

अशीच अवस्था तालुक्यातीलच गर्रा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मागे तयार करण्यात आलेल्या रस्त्याची असून सदर रस्ता बांधकामावर वापरलेला सिमेंट कधी तयार करण्यात आला याचाही उल्लेख नाही, अशाप्रकारे सिमेंट वापरुन रस्त्याचे बांधकाम होत आहे. तालुक्यातीलच गिरोला येथेही नुकतेच सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आले असून महिना सुध्दा लोटायला असताना त्या सिमेंटरस्त्यात वापरलेली गिट्टी वर आल्याचे बघावयास मिळते. सिमेंट रस्त्याला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या कामाची चौकशी व्हावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे. रस्त्याचे बांधकाम होत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी कामाची पाहणी करायला हवे होते,मात्र काम सुरु असतांना अभियंते फिरकलेच नसल्याचे नागरिकांचे म्हणने आहे. मग्रारोहयो (अभिसरण) योजनेंतर्गत चुटीया येथे काम सुरु असून



त्या कामाची गुणवत्ता तिसऱ्या पक्षाकडून निष्पक्ष तपासण्यासारखी असतानाही मग्रारोहयोचे अभियंते मात्र काम चांगला असल्याची बता–वणी करुन पेटी कंत्राटदाराची बाजू घेत साटेलोटे करीत असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातीलच नवेगाव कला येथे सुध्दा गेल्या एक महिन्यापुर्वीच तयार करण्यात आलेला सिमेंट रस्ता फुटायला लागला आहे. सिमेंट रस्ता कामाचा दर्जा अतिशय खालावलेला आहे.त्याचबरोबर खडी उखडून रस्त्यावर येऊ लागल्याने बांधकाम विभागाच्या अभियंत्याची सुध्दा कंत्राटदारासोबतच चौकशीची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून दिल्लीत नेली जाणार अमृत वाटिका निर्मितीसाठी माती-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे



**गोंदिया:–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच त्यांच्या “मन की बात’ कार्यक्रम प्रसारणादरम्यान ‘मेरी माटी मेरा देश’ मोहिमेची घोषणा केली होती. देशासाठी बलिदान दिलेल्या शूर स्वातंत्र्य सैनिकांचा आणि शूरवीरांचा सन्मान करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेत शूरवीरांच्या (वीर) स्मरणार्थ जिल्हाभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अमृत सरोवरांजवळील ग्रामपंचायतींमध्ये शिलाफलक (स्मारक फलक) उभारले जातील. तसेच जिल्ह्या–तील सर्व अमृत सरोवरावर प्रत्येकी ७५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. अमृत वाटिका निर्मितीसाठी अमृत कलश यात्रेत जिल्ह्याच्या कानाकोप?यातून दिल्लीत माती नेली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जिल्हा सह आयुक्त (नपाप्र) करण चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे उपस्थित होते.

‘मेरी माटी मेरा देश’ हा भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करणाऱ्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा समारोप कार्यक्रम असेल. गेल्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या “हर घर तिरंगा’ या देशव्यापी अभियानाला गोंदिया जिल्ह्यात अभूतपूर्व यश मिळाले आणि यावर्षी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत ‘मेरी माटी मेरा देश’ हा आणखी एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरु करण्यात येत आहे. याला सुद्धा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

शूरवीरांना आदरांजली म्हणून शिलाफलक बसवणे, मिट्टी का नमन आणि वीरों का वंदन हे ‘मेरी माटी मेरा देश’ या मोहिमेचे प्रमुख घटक असल्याचे चिन्मय गोतमारे यांनी स्पष्ट केले. ‘मेरी माटी मेरा देश’ या मोहिमेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून यावर्षीही “हर घर तिरंगा’ अभियान आयोजित केले जाईल असे त्यांनी सांगितले. या मोहिमेबद्दल जागरुकता निर्माण करण्यात आणि ती जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात नेण्यात माध्यमांची भूमिकाही त्यांनी अधोरेखित केली.

या मोहिमेमध्ये आपल्या शूरवीरांच्या बलिदानाला अभिवादन म्हणून स्वातंत्र्यसैनिक आणि सुरक्षा दलांना समर्पित शिलाफलकांची उभारणी तसेच पंच प्रण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीरों का वंदन यांसारखे उपक्रम सादर केले जा–तील. वीरहृदयांची गाव, पंचायत, गट, शहर, नगरपालिका क्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाच्या भावनेला वंदन करणारे शिलाफलक किंवा स्मारक फलक शहरी आणि ग्रामीण भागात उभारले जाणार आहेत. त्यामध्ये त्या भागातील ज्या शूरवीरांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली त्यांच्या नावांबरोबर पंतप्रधानांचा संदेश असेल. ही मोहीम १२ मार्च २०२१ रोजी सुरू झालेल्या ‘स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव’ या विशेष आयोजनाच्या समारोपाचा कार्यक्रम आहे. ९ ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान ‘मेरी माटी मेरा देश’ मोहिमेत गाव आणि गट स्तरावर स्थानिक शहरी संस्था स्तरावरील कार्यक्रमांचा समावेश असेल असेही त्यांनी सांगितले.

दिल्लीत ‘अमृत वाटिका’ तयार करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन ‘अमृत कलश यात्रा’ काढण्यात येणार असून ही ‘अमृत वाटिका’ ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ या वचनबद्धतेचे प्रतिक असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेत गोंदिया जिल्ह्यातील गावा–गावांमधून माती जमा करुन ती दिल्ली येथे नेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी (लोकसहभाग) https://meri-maatimeradesh. gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून लोकं माती किंवा मातीचा दिवा हाती धरुन काढलेला सेल्फी या संकेतस्थळावर अपलोड करू शकतील.

या कृतीतून लोकं भार–ताला विकसित देश बनवणे, गुलामगिरीची मानसिकता दूर करणे, आपल्या समृद्ध वारसाचा अभिमान बाळगणे, एकता आणि बंधुता टिकवून ठेवणे, नागरिकांची कर्तव्ये पार पाडणे आणि देशाचे रक्षण करणाऱ्यांप्रती आदर व्यक्त करणे यावर लक्ष केंद्रित करुन पंच प्रणांची प्रतिकात्मक प्रतिज्ञा घेतली जाईल. अशा प्रकारे राष्ट्र प्रतिज्ञा घेतल्यानंतर सहभागाचे डिजिटल प्रमाणपत्र वेबसाईटवरुन डाऊनलोड केले जाऊ शकते. गेल्यावर्षी सर्वांच्या सहभागामुळे “हर घर तिरंगा” उपक्रम यशस्वी झाला होता. यावर्षी देखील १३ ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान ‘हर घर तिरंगा’ उपक्रम साजरा केला जाणार आहे. भारतीय सर्वत्र राष्ट्रध्वज फडकावू शकतात आणि तिरंग्यासोबत सेल्फी काढून ‘हर घर तिरंगा’ संकेतस्थळावर अप–लोड करू शकतात. (harghar-tiranga. com) या देशव्यापी मोहिमेचा तपशील https: //yuva.gov.in/meri_maa-ti_mera_desh या पोर्टलवर पाहता येईल.

‘मेरी माटी मेरा देश’ मोहीम ९ ऑगस्ट रोजी सुरू होईल आणि १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिनापर्यंत नियोजित कार्यक्रमांसह चालणार आहे. त्यानंतरचे कार्यक्रम १६ ऑगस्ट २०२३ पासून गट, नगरपालिका/ नगरपरिषद आणि राज्य स्तरावर होतील. ३० ऑगस्ट २०२३ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत कर्तव्य पथ, नवी दिल्ली येथे समारोप समारंभ होणार आहे. तरी गोंदिया जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी ममेरी माटी मेरा देशफ मोहिमेला लोकचळवळीचे स्वरुप देऊन या उपक्रमात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

# निवासी प्रयोजनार्थ असलेल्या अकृषक प्लॉटवर अनाधिकृत वाणिज्यिक वापर

**विष्णू वैरागडे**

**गडचिरोली:–**देसाईगंज नगर पालिका हद्दीत निवासी प्रयोजनार्थ असलेल्या अकृषक प्लाट वर अनाधिकृत वाणिज्यिक प्रयोजन करून शासनाची फसवणूक करून लाखो रुपयांचा महसूल बूडविल्या प्रकरणाची चौकशी सुरू केल्याने भुखंड माफियांचे धाबे दणाणले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून देसाईगंज शहर ओळखल्या जाते . शिवाय गडचिरोली जिल्हा निर्मिती पुवी पासुन देसाईगंज नगर परिषद अस्तित्वात आहे. यासोबतच गडचिरोली जिल्ह्यात एकमेव रेल्वे स्टेशन असल्याने या शहराकडे भुखंड माफियां मोठ्या प्रमाणात सक्रिय आहेत. कमीतकमी गुंतवणूकीत जास्तीत जास्त पैसा कसे कमवता येईल याकडे लक्ष केंद्रित केलेले आहे. निवासी प्रयोजनार्थ असलेल्या अकृषक प्लॉटवर अनाधिकृत वाणिज्यिक वापर हा याचाच एक भाग मानला जात असुन देसाईगंज शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. देसाईगंज नगर परिषद हद्दीत शहरातील भुखंड माफियां यांनी रहिवासी प्रयोजनार्थ असलेल्या अकृषक प्लाटवर वाणिज्यिक प्रयोजनार्थ व्यावसायिक गाळे बांधले असून ते मोठी रक्कम उकळून नियमबाह्य पद्धतीने विक्री सुरू केली आहे.तर काही भुखंड माफियांनी रहिवासी प्रयोजनार्थ मंजुरी असलेल्या अकृषक प्लॉटवर पेट्रोल पंप, शोरूम, मॉल, हॉस्पिटल, कपडा बाजार, किराणा दुकान व व्यावसायिक गाळे बांधुन थेट वाणिज्यिक व्यवसाय करून करून शासनाची फसवणूक करून लाखोचा महसूल बूडविल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. या प्रकरणी महसूल विभागाने चौकशी सुरूकेली असल्याने एकच खळबळ माजली आहे. रहिवासी प्रयोजनार्थ मंजुरी असलेल्या अकृषक प्लॉटवर अनाधिकृत वाणिज्यिक वापर करून करणाय्रा भुखंडाची माहिती एका भुखंड माफियांचा अवैध फेरफार

## “त्या”मंडळ अधिकाऱ्यांकडून प्रभार काढला

**जमीन अकृषक प्रयोजनार्थ लेआउट मंजूर करतांना लावण्यात येणाऱ्या अटी व शती भंग करून रहिवासी प्रयोजनार्थ मंजूर असलेल्या अकृषक लेआउटवर वाणिज्यिक प्रयोजन गाळे बांधुन बेकायदेशीर विक्री केल्याचा आलेला फेरफार रद्द करुन गंभीर तेवढाच धक्कादायक प्रकार उघडकीस आणणाय्रा मंडळ अधिकाय्राकडुन प्रभार काढल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे शासनाची फसवणूक करून लाखो रुपयांचा महसूल बूडविणाय्रा भुखंड माफियांना खुष करण्यासाठी फलस्वरुप चक्क मंडळ अधिकाय्रालाच शिक्षा दिल्याची खमंग चर्चा सुरूआहे. या प्रकरणी आता जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.**

रद्द केल्याने दुखावलेल्या या भुखंड माफियांच्या बोटाच्या इशारावर नाचणारे महसूल अधिकारी व कम 'चारी यांनी माहिती गोळा करणे सुरू केले असले तरी संबंधित अधिकारी वाणिज्यिक दंड आकारुन शासनाची फसवणूक केल्याने खरंच कारवाई करून सदर जमिन सरकार जमा करणार कि प्रकरण अर्थपूर्ण व्यवहार करुन प्रकरण पुन्हा दडपल्या जाईल असा सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे.




## संपादकीय

# राजकीय "कार्यकर्ता" ठेकेदारीत हरवला:!

राजकीय, सामाजिक कार्यकर्ता म्हटला की, नि:स्वार्थ भाव-नेने लोकहितासाठी झटणारी गावातील एखादी जबाबदार व्यक्ती, स्वत: ची मिठभाकरी खाऊन सामाजिक उपक्रमात आणि कार्यामध्ये सतत झटणारा तो कार्यकर्ता. निवडणूक असो की कोणतेही सामाजिक काम त्यात तो अग्रेसर असायचा. त्याच्या दृष्टीने समाजात काही चांगलं होत असेल तर त्यासाठी सतत झटत, धडपडणारा कार्यकर्ता पूवी दिसायचा. एककाळ ङ्कार्यकर्ताफ या शब्दाला मोठं वलय होतं. या वलयामागे नि: स्वार्थ भाव होता. त्याला प्रामाणिकतेची, निष्ठेची जोड होती. त्यामुळे या अशा कार्यकर्त्यांचा समाजात एक रुबाब होता. समाजालाही त्याचा सार्थ अभिमान वाटायचा. कार्यकर्ता हा काही फक्त राजकीय पक्षाचे काम करणारा असं त्याचं स्वरुप कधी असत नाही.

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रांत काम करणारा तो कार्यकर्ता; परंतु गेल्या पंचवीस वर्षांत कार्यकर्ता या नावाला अनेक दूषणं जोडली गेली. म्हणजे कार्यकर्त्यातला माणूसच बदलला. यामुळे कार्यकर्ता जो डोळ्यांसमोर येतो तो समाजवादी पक्षाच नि:स्वार्थपणे काम करणारा कार्यकर्ता. तेव्हा देण्यासारखं त्या काळच्या नेत्यांकडेही काही नव्हत. त्यामुळे स्वार्थभावना कुठेच नव्हती. ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण हा मूलभूत विचार घेऊन काम करणारा शिवसैनिक समाजातील गोरगरिबांच्या अडचणीत धावून जायचा. कोणत्याही नेत्यांच्या वाढदिवसाचे औचित्य न करता आरोग्य शिबिरं व्हायची. त्या शिबिरात गोरगरीब गरजूंना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हायची. एकूणच गेल्या काही वर्षांत राजकीय पोत बदलला. काँग्रेस पक्षात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला मारी बिस्किटं आणि चहा मिळाला तरी तो त्यावेळचा कार्यकर्ता खूशच होता. याचे कारण जनता दलाच्या समाजवादी कार्यकर्त्याला चहा देखील मिळत नव्हता; परंतु याच कोकणात बॅ. नाथ पै, प्रा. मधू दंडवते यांच्यासाठी उपाशी फिरणारे, विचाराने भारावलेले कार्यकर्ते या महाराष्ट्राने पाहिले आहेत; परंतु विचाराने ज्ञान वाढेल परंतु पोटाची खळगी भरता येत नाही. हा विचार समाजामध्ये रूढ होत गेला. मग "कार्यकर्ता' नावाच्या माणसाची चहा बिस्किटं, वडापाव, बिर्याणी आणि मग पुढे सारंच वाढत गेलं. यात प्रामाणिकता, नि:स्वार्थपणा, निष्ठा सर्वकाही कुठल्या-कुठे गळून पडले. सारं स्वरुपच बदललं. राजकारणच बदललं. गावातील रस्ते, पिण्याचे पाणी, त्यासाठीच्या योजना, वीज, शिक्षणाच्या सुविधा अशा काही मूलभूत सुविधापुरता विकासाची कल्पना होती. त्यासाठी झटणारा गा-वचा कार्यकर्ता होता. त्यानंतर अलीकडच्या काळात राजकारण बदललं. विकासाच्या संकल्पना बदलल्या आणि यात गावोगावी काम करणारा कार्यकर्ताही बदलला.

या बदलत्या राजकीय, सामाजिक स्थित्यंतरातही कार्यकर्ता नावाचे नि:स्वार्थी, साधेपणाने वावरणारे काही चेहरे दिसतात; परंतु एवढ्या मोठ्या स्वार्थी दुनियेत नि:स्वार्थ भावनेने काम करणारा कार्यकर्ता नेत्याच्या दृष्टीसही पडेनासा होतो. "सब घोडे बारा टक्के' असंच होऊन जातं. पण एक गोष्ट सत्य आहे. चांगुलपणाने चांगलं काम करणारी काही माणसं या समाजात चांगलं काम करत वावरत आहेत. त्यांच्यातला चांगुलपणा जागो-जागी दिसतो. याच अशा चांगलेपणावर आजच्या समाजव्यवस्थेचा गाढा पुढे जातोय. कार्यकर्त्यांच्या व्याख्येतील हा बदल काही कुठल्या एखाद्या राजकीय पक्षापुरता किंवा एखाद्या सामाजिक संघटनेपुरता मर्यादित राहिलेला नाही. त्याचं स्वरुप खूप मोठं आहे. सगळीकडे एकाच मुखवट्यात वावरणारे कार्यकर्ते दिसतात. खरं असे मुखवटे धारण करणारे ठेकेदार कम कार्यकर्ते ते कोणा एकाचे वा कोणत्या एका पक्षाचे मुळीच नसतात. ते त्यांच्या व्यावसायाशी प्रामाणिक असतात. एवढे मात्र खरं. यात दोष कोणी कोणाला द्यायचा हा प्रश्नही निर्माण होता. खरोखरीच कोणी प्रामाणिकपणे काम करू लागला तरीही त्याची प्रामाणिकता शंभर नंबरी सोन्यासारखी असली तरीही त्याला इतरांच्या बरोबरीतच नेऊन बसवले जाते. एवढंच कशाला प्रशासनातील एखादा अधिकारी जरी प्रामाणिक असेल, नॉन करप्ट असेल तरीही समाजमन त्याच्या या प्रामाणिकतेवरही प्रश्न उपस्थित करताना दिसतो. कालचा प्रामाणिकपणा आजचे जग स्वीकारत नाही. शंका-कुशंकांची माळा घेऊनच त्या प्रामाणिकतेचे स्वागत होते. हे समाजाचे दुर्दैवच आहे. या अशा बजबजपुरीत कार्यकर्ता इतका बदलत गेला की, तो थेट कार्यकर्त्यांचा ठेकेदार कधी झाला हे त्याचं त्यालाच कळल नाही. कोणताही व्यवसाय म्हटला की, आपोआपच जीवघेणी स्पर्धा, या स्पर्धेत टिकून राहण्यासाठीची सर्वांचीच असलेली धडपड. यात धडपडीत कामाची गुणवत्ताही शोधावी लागते. म्हणूनच रस्ते तयार झाल्यावर सहा महिन्यांत त्याचा मुलामा निघून गेलेला असतो आणि मग कोणत्याही मार्गावर कितीही लाख खर्च झाला तरी वाहनचालक आणि प्रवाशांच्या नशिबी येतो तो दगड, धोंडे आणि खड्ड्यातून मार्ग काढत जाणारा प्रवास करण्यात आयुष्य आढळ-आपटमध्ये व्यथित करावे लागते.

समाजव्यवस्थेत बदल हा घडतच असतो. त्याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही; परंतु या बदलात बदलत्या परिस्थितीत "कार्यकर्ता'च हरवला आहे हे अतिशय बारकाईने पाहिले की निश्चितच लक्षात येईल. तो दिसतो पण तरीही तो व्यावसायिकतेत त्याला आपण कार्यकर्ता आहोत याचंही भान राहात नाही. व्यासपीठावर सर्वच कार्यकर्तेच असतात. प्रत्यक्षात व्यावहारिक जीवनात हा कार्यकर्ता हरवलाय एवढं खरं.

# इर्री-नवरगाव(खुर्द)रस्ता तात्काळ दुरुस्त करा



**गोंदिया-** मागच्या दोन वर्षापासून गोंदिया तालुक्यातील इर्री-नवरगाव (खुर्द), इर्री-नवरगाव (कला) हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे.रस्ता खराब असल्यामुळें या रस्त्यावर दररोज अपघात घडून येत आहेत.असे असले तरी या रस्त्याची प्रशासना तर्फे अजूनही दुरुस्ती करण्यात आली नाही. सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी पूर्व पंचायत समिती सदस्य रूपचंद ठकरेले यांनी प्रशासनाकडे केली आहे.

अत्यंत वर्दळीचा रस्ता म्हणून या मार्गाची ओळख आहे. कातुरली, मोहगाव, करंजी, मोरवाही, कालीमाती,भोसा या भागातील नागरिक गोंदियाला येण्यासाठी याच मार्गाचा अवलंब करीत असतात. दररोज हजारो प्रवासी या रस्त्यावरून येणे जाणे करीत असतात.असे असले तरी हा रस्ता मागच्या दोन वर्षापासून अत्यंत बिकट झालेला आहे. सदर मार्ग दुरुस्तीसाठी परिसरातील नागरिकांनी अनेक निवेदने प्रशासनाकडे दिली. मध्यंतरी जि. प.च्या निवडणुकी काळात इररी येथिल तत्कालीन प्रभारी सरपंचाने या रस्त्यावर मुरूम टाकून स्वतःची पाठ थोपाटण्याचा प्रयत्न केला मात्र निवडणुका झाल्यानंतर या मार्गाला "जैसे थे वैस0" दिन परत आले.हा संपूर्ण रस्ताच खडेमाय असल्यामुळे चालावे कुठून हा प्रश्न नागरिकांना पडत आहे.जागोजागी खड्डे असल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे.सोबतच नवरगाव कला या मार्गाची स्थीती सुध्दा अत्यंत बिकट झालेली आहे. हे दोन्ही मार्ग दुरुस्तीसाठी अनेकदा प्रशासनाकडे मागणी करण्यात आली परंतु बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे.कदाचित एखादी मोठी दुर्घटना घडण्याची तर प्रशासन वाट पाहत नाही ना? असा आरोपही प्रसिद्धी पत्रकातनमूद लावण्यात आला आहे.लोकप्रिनिधींनी या मार्गावरून एकदा तरी प्रवास करुन पहावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.नागरिकांचे हित लक्षात घेता हा मार्ग त्वरित दुरुस्त करुन द्यावा अन्यथा ग्रामवाशी रस्त्यावर उतरतील असा इशाराही ठकरेले यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# "वीरांना" श्रद्धांजली वाहण्यासाठी "मेरी माटी मेरा देश" मोहीम

देशासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेल्या "वीरांना'श्रद्धांजली वाहण्यासाठी "मेरी माटी मेरा देश" मोहीम देशभरात राबविण्यात येणार आहे. यानिमित्ताने गावापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत देशव्यापी जन-भागीदारी कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. या उपक्रमाअंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये शिलाफलक (स्मारक फलक) बसवण्यात येणार असून अमृत वाटिका निर्मितीसाठी अमृत कलश यात्रेत देशाच्या कानाकोपऱ्यातून दिल्लीत माती नेली जाणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील गावा-गावांमधून माती संकलीत करून दिल्ली येथे पाठविली जाणार आहे. "माझी माती, माझा देश" या मोहिमेत जिल्हा उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच त्यांच्या "मन की बात" कार्यक्रम प्रसारणादरम्यान "मेरी माटी मेरा देश" मोहिमेची घोषणा केली होती. देशासाठी बलिदान दिलेल्या शूर स्वातंत्र्यसैनिकांचा आणि शूरवीरांचा सन्मान करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेत शूरवीरांच्या (वीर) स्मरणार्थ देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अमृत सरोवरांजवळील ग्रामपंचायतींमध्ये शिलाफलक (स्मारक फलक) उभारले जातील.

"मेरी माटी मेरा देश" हा भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करणाऱ्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा समारोप कार्यक्रम असेल. गेल्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या "हर घर तिरंगा' या देशव्यापी अभियानाला अभूतपूर्व यश मिळाले आणि यावर्षी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत "मेरी माटी मेरा देश" हा आणखी एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरु करण्यात येत आहे.

शूरवीरांना आदरांजली म्हणून शिलाफलक बसवणे, मिट्टी का नमन आणि वीरों का वंदन हे "मेरी माटी मेरा देश" या मोहिमेचे प्रमुख घटक आहेत. "मेरी माटी मेरा देश" या मोहिमेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून या वर्षीही "हर घर तिरंगा' अभियान आयोजित केले जाईल. या मोहिमेबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आणि ती देशाच्या कानाकोपऱ्यात नेण्यात माध्यमांची भूमिकाही आहे.

या मोहिमेमध्ये आपल्या शूरवीरांच्या बलिदानाला अभिवादन म्हणून स्वातंत्र्यसैनिक आणि सुरक्षा दलांना समर्पित शिलाफलकांची उभारणी तसेच पंच प्रण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीरों का वंदन यांसारखे उपक्रम सादर केले जातील. वीरहृदयांची. गाव, पंचायत, गट, शहर, नगरपालिका




क्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाच्या भावनेला वंदन करणारे शिलाफलक किंवा स्मारक फलक शहरी आणि ग्रामीण भागात उभारले जाणार आहेत. त्यामध्ये त्या भागातील ज्या शूरवीरांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली त्यांच्या नावांबरोबर पंतप्रधानांचा संदेश असेल. ही मोहीम १२ मार्च २०२१ रोजी सुरू झालेल्या मस्वातंत्र्याचा अमृत महोत्सवफ या विशेष आयोजनाच्या समारोपाचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत भारतभरात २ लाखाहून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. देशभरातील जन-तेने यात व्यापक लोकसहभाग (जन-भागीदारी) नोंदवला आहे. ९ ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान "मेरी माटी मेरा देश" मोहिमेत गाव आणि गट स्तरावर स्थानिक शहरी संस्था तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांचा समावेश असेल.

दिल्लीत 'अमृत वाटिका' तयार करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन 'अमृत कलश यात्रा' काढण्यात येणार असून ही 'अमृत वाटिका' 'एक भारत श्रेष्ठ भारत' या वचनबद्धतेचे प्रतिक असेल. जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी (जन-भागीदारी) https://merimaatimeradesh.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून लोकं माती किंवा मातीचा दिवा हाती धरून काढलेला सेल्फी या संकेतस्थळावर अपलोड करू शकतील. या कृतीतून लोकं भारताला विकसित देश बनवणे, गुलामगिरीची मानसिकता दूर करणे, आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगणे, एकता आणि बंधुता टिकवून ठेवणे, नागरिकाची कर्तव्ये पार पाडणे आणि देशाचे रक्षण करणाऱ्यांप्रती आदर व्यक्त करणे यावर लक्ष केंद्रित करून पंच प्रणांची प्रतिकात्मक प्रतिज्ञा घेतात.

अशा प्रकारे राष्ट्र प्रतिज्ञा घेतल्यानंतर सहभागाचे डिजिटल प्रमाणपत्र वेबसाईटवरुन डाउनलोड केले जाऊ शकते. गेल्या वर्षी सर्वांच्या सहभागामुळे 'हर घर तिरंगा' उपक्रम यशस्वी झाला होता. यावर्षी देखील १३ ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान 'हर घर तिरंगा' उपक्रम साजरा केला जाणार आहे. भारतीय सर्वत्र राष्ट्रध्वज फडकवू शकतात आणि तिरंग्यासोबत सेल्फी काढून 'हर घर तिरंगा' संकेतस्थळावर अपलोड करू शकतात. (harghartiranga.com).

या देशव्यापी मोहिमेचा तपशील https://yuva.gov.in/meri_maati_mera_desh या पोर्टलवर पाहता येईल. पोर्टलवर केवळ 'मेरी माटी मेरा देश'मोहिमेतील विविध उपक्रमांची संबंधित माहिती नसून, तरुण या वेबसाईटवर सेल्फी आणि रोपे लावण्यासारखे उपक्रम अपलोड करुन या पोर्टलद्वारे मोहिमेत सामील होऊ शकतात. तरुणांनी या मोहिमेत उत्साहाने सहभागी होण्याचे तसेच आपल्या शूरवीरांना आणि आपल्या मातृभूमीला आदरांजली वाहण्यासाठी देशव्यापी कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आकाशवाणी, दूरदर्शन आणि प्रसार भारतीच्या इतर डिजिटल व्यासपीठाद्वारे 'मेरी माटी मेरा देश' मोहिमेचे प्रसारण केले जाणार आहे.

'मेरी माटी मेरा देश' मोहीम ९ ऑगस्ट रोजी सुरू होईल आणि १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिनापर्यंत नियोजित कार्यक्रमांसह चालणार आहे. त्यानंतरचे कार्यक्रम १६ ऑगस्ट २०२३ पासून गट, नगरपालिका/नगरपरिषद आणि राज्य स्तरावर होतील. ३० ऑगस्ट २०२३ रोजी कर्तव्य पथ, नवी दिल्ली येथे समारोप समारंभ होणार आहे. या मोहिमेत सहभागी होऊन 'वीरांना' श्रद्धांजली वाहू या.

**- रवि गिते**
जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया


# १८ जानेवारी २००९ आणि पवित्र कुराण : एक अनुबंध

मी गडचिरोली येथे जिल्हा सहकार निबंधक म्हणून कार्यरत होतो. त्याच अधिकारान्वये मी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारीही होतो. जिल्ह्यातील चामोर्शी येथील कृउबासच्या निवडणूकीची मतदानाची तारीख १८ जानेवारी २००९ होती. चामोर्शी येथील ही निवडणूक अतिशय चुरशीची व केव्हाही धोकादायक वळण घेऊ शकेल अशी राहत असल्याबद्दल माझ्या स्टॉफने मला धोक्याची पूर्वसूचना दिली होती. त्यामुळेच कोणताही धोका पत्करू नये म्हणून मी, तसे अनिवार्य नसतानाही, चामोर्शी कृउबासच्या निवडणूकीसाठीच्या सर्व मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष भेटींद्वारे नजर ठेवून होतो. याच दिवशी चामोर्शी तालुक्यातील एका गावात झाडीबोली साहित्य संमेलन आयोजित होते. मी झाडीबोली साहित्य मंडळाचा आजीव सभासद व कार्यकारिणी सदस्य असल्याने मधूनमधून या संमेलनातही मी अल्पकाळ हजेरी लावून जात असे.

या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मी एका सक्षम, तडफदार व अभ्यासू तालुका सहकार निबंधकाची नेमणूक केल्याने मला सदरील निवडणूक निर्विघ्न पार पडण्याची खात्री होतीच. तरी पूर्वानुभव लक्षात घेता, रिस्क न घेता, मी वरीलप्रमाणे माझी कार्यपद्धती अवलंबिली होती. या दौऱ्यात माझ्यासोबत माझा एक कनिष्ठ अधिकारी सुद्धा घेतला होता. माझ्या कार्यालयाची ॲम्बेसेडर कार राईट ऑफ होऊनही शासनाकडून दुसरी कार न मिळाल्याने मी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची गाडी उधार घेऊन हा दौरा करीत होतो.

अखेर कृउबास चामोर्शीची निवडणूक निर्विघ्न पार पडली. झाडीबोली साहित्य संमेलनाचेही सूप वाजले व सायंकाळी मी बँकेच्या टाटा सुमो गाडीने गडचिरोलीकडे मुख्यालयी परत यायला निघालो. गाडीत माझ्यासोबत माझा कनिष्ठ अधिकारी व ड्रायव्हर असे आम्ही तिघेच होतो.

गडचिरोली-चामोर्शी रस्त्यावर गडचिरोलीजवळच सेमाना नावाचे एक सुप्रसिद्ध देवस्थान आहे. हे देवस्थान पार केल्यानंतर गडचिरोलीतील शासकीय कार्यालयांच्या संकुलाकडे जाण्यासाठी डावीकडून एक अरुंद असा उंचसा बायपास रस्ता आहे. त्यामुळे गडचिरोली शहरात न जाता या संकुलाकडे डायरेक्ट जाता येते. माझे शासकीय निवासस्थान या संकुलाकडेच असल्याने आमची गाडी या बायपास रस्त्याला लागली. आणि अगदी थोड्याच वेळात या बायपास रस्त्यावरून संकुलाकडून एक तरुणी स्कूटीद्वारे येत असता ती अकस्मात बावरली आणि तिची स्कूटी त्या अरुंद रस्त्याच्या मधोमध अगदी आमच्या गाडीसमोर आली. त्या तरुणीला वाचवण्याच्या प्रयत्नात आमची टाटा सुमो त्या अरुंद रस्त्याच्या बाजूला लागूनच खाली ठेवलेल्या बोल्डर/दगडांच्या ढिगावर फेकली गेली. मी समोरच्या सीटवरच ड्रायव्हरच्या बाजूला बसलो होतो आणि नेमका त्याच दिवशी मी सीटबेल्ट लावला नव्हता. आमची गाडी त्या दगडांच्या ढिगावर फेकली जाऊन आदळताच गाडीचा समोरचा काच निखळून पडला. गाडीचा समोरचा एक्सल (?)ही तुटला. या हडबडीत मी माझ्या डाव्या हाताने डाव्या हाताकडील गाडीच्या दरवाज्याच्या वरील हॅण्डलला करकचून धरून ठेवले असल्याने मी गाडीबाहेर/गाडीसमोर फेकला जाण्यापासून वाचलो. पण त्यासाठी माझा डावा हात पूर्णतः उखडून तो माझ्यासाठी शहीद झाला. थोड्याच वेळात भयंकर वेदना जाणवू लागल्या. मला त्या वेदनेमुळे हलताडुलताही येत नव्हते. थोडासाही हलायचा प्रयत्न केल्यास भयंकर वेदनेची कळ उठायची. माझा ड्रायव्हर व तो कनिष्ठ अधिकारी यांना साधे खरचटण्याशिवाय काहीच दुखापत झाली नव्हती. माझी अवस्था




पाहून ते दोघेही अक्षरशः घाबरून व भांबावून किंकर्तव्यमूढ होऊन बसले होते.

अखेर मीच त्यांना बोललो की, मला गाडीतून उचलून बाहेर काढा. इतक्या वेळात तिथे काही बघेही उपस्थित होऊन "किती मेले" म्हणून विचारू लागले होते, पण मदतीला कोणीच आले नाही. ड्रायव्हर आणि माझ्या त्या सहकाऱ्याने मिळून कसेतरी मला गाडीबाहेर काढून जमिनीवर झोपवले, कारण मी बसूही शकत नव्हतो. माझ्यासोबतच्या दोघांची अशी अवस्था बघून मीच कसातरी माझ्या उजव्या खिशातून मोबाईल काढून सर्वप्रथम, नागपूर येथे एलएल.बी. करीत असलेल्या माझ्या मुलाला, अपघाताची माहिती दिली व नागपूर येथील एखाद्या दवाखान्यात तशी पूर्वसूचना देवून आवश्यक पूर्वतयारी करून ठेवण्यास सांगितले. नंतर बँकेत फोन करून ताबडतोब एक ॲम्बुलन्स पाठविण्यास सांगितले. या संपूर्ण कालावधीत माझे दोन्ही सहकारी अगदी भांबावून जाऊन हतबल होऊन गेले होते. पण माझ्यात कुठून हिंमत अवतरली माहित नाही, तशा गंभीरतम अवस्थेतही मी संपूर्ण परिस्थितीचा ताबा घेऊ शकलो होतो.

लवकरच ॲम्बुलन्स आली. आता मी विचार केला की, नागपूरला पोचायला तीनेक तास लागतील आणि ८० किमीवरील चंद्रपूर येथील माझे पूर्वपरिचित डॉ.गाडेगोणे यांचेकडे तात्काळ पोचणे प्रथमोपचाराचे दृष्टीने योग्य राहील. असा विचार करून मी पूर्वी चंद्रपूर येथे डीडीआर असल्याने तेथील स्टाफला व डॉ.गाडेगोणे यांना तशी मोबाईलवर पूर्वसूचना देऊन भयंकर वेदनेसह(?) ॲम्बुलन्सने चंद्रपूरच्या डॉ.गाडेगोणे यांच्या दवाखान्यात दाखल झालो. तिथे चंद्रपूर येथील माझा जुना स्टॉफ उपस्थित होता व त्यांनी सर्व पूर्वतयारी करुन ठेवली होती. आता मी गडचिरोली येथे माझ्या पत्नीला हे सर्व कळविण्यास व तिला चंद्रपूर येथे बोलावून घेण्यास सूचना करुन डॉ.गाडेगोणे यांच्या हवाली झालो.

प्रथमोपचारानंतर मी रात्री केव्हातरी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या उशाकडे पत्नीसह चंद्रपूर येथील काही स्टॉफ व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. चंद्रपूर येथील सुरजुसे व कुमरे या तरुण स्टॉफच्या पत्नींना मी माझ्या मानसकन्या मानत असल्याने त्यांनी अगदी सख्ख्या बापासारखी माझी काळजी वाहिली. दुसऱ्याच दिवशी डॉ.गाडेगोणे यांनी मला सांगितले की माझा डावा हात खांद्यापासून उखडून गेला असून सर्व लिगामेन्ट्स एकतर तुटल्यात किंवा कायमच्या निकामी झाल्यात. फक्त चामडी न फाटल्याने हात विलग झाला नसला तरी आता हा हात पूर्ववत होणे शक्य नाही. याला त्यांनी BRACHIAL PLEXUS INJURY असे वैद्यकीय नाव सांगितले व यापुढील उपचारासाठी नागपूर येथे जाण्याचा सल्ला दिला.

नागपूरला तीन-चार डॉक्टरांकडे सल्ला, औषधोपचार, दवाखान्यात दाखल होणे आदि सोपस्कार करुनही कोणीच रीतसर सल्ला न देता हात कापण्याशिवाय पर्याय नाही असे प्रत्यक्षाप्रत्यक्ष सांगू लागले. अखेर कंटाळून मी पुन्हा चंद्रपूर येथील डॉ.गाडेगोणे यांच्याकडे जाऊन त्यांना नागपूर येथील डॉक्टरांसोबतच्या सर्व हकीकतींबद्दल अवगत केले. त्यावर सविस्तर विचारविमर्श करुन त्यांनी मला पुणे येथील जगप्रसिद्ध हॅण्ड एक्स्पर्ट डॉ.अनिल भाटिया व सुप्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ.आशिष बाभुळकर यांचा सल्ला व उपचार घेण्यास सुचवले. या सर्व भानगडीत २०-२५ दिवस व्यर्थच वाया गेले. पुणे येथे जावई विवेक तुरकर व कन्या सौ.आम्रपाली राहत असल्याने अखेर मी २०-२१ फेब्रुवारी २००९ ला पत्नीसह पुणे येथे पोचून डॉ.अनिल भाटिया व डॉ.आशिष बाभुळकर यांच्याकडून संचेती हॉस्पिटल पुणे येथे तीन दीर्घकालीन शस्त्रक्रियादिंचा व तेथीलच डॉ.जेम्स व चमूकडून फिजिओथेरपीचा दीर्घतम (सुमारे पाच महिने) उपचार घेतला.

या उपचारादरम्यान मी संचेती हॉस्पिटल पुणे येथे दाखल/रवाळीं असताना पुणे येथील वर्तमान पत्रे वाचत असे. त्यातून कळले की, संचेती हॉस्पिटलजवळच सुमारे १-२ किमीवरील एका मशिदीत मराठीतील पवित्र कुराणाचे निशुल्क वितरण केले जात आहे. यापूवी मी आचार्य विनोबा भावे लिखित कुर्आण सार व शेषराव मोरे लिखित मुस्लिम मनाचा शोध यांचे वाचन केले असल्याने तथा हैदराबाद येथून खरेदी केलेल्या इंग्रजी, हिंदी व (देवनागरी लिपीतील) उर्दूतील पवित्र कुराण वेळेअभावी सलग वाचनासाठी प्रलंबितच असल्याने मला संपूर्ण कुराण सलग वाचण्याची इच्छा झाली. आणि तशाही अवस्थेत मी पत्नीसह त्या मशिदीत जाऊन पवित्र कुराणाची मराठी प्रत प्राप्त केली व माझ्या या अपघातजन्य कालावधीत मराठीतील पवित्र कुराणाचे यथाशक्य वाचन केले. त्या पवित्र कुराणाच्या प्रतींचे प्रकाशचित्र द्यायची इच्छा असूनही इथे तसे करता येत नसल्याचे कळल्याने तो इरादा रद्द केलाय. असो.

तर अश्याप्रकारे माझ्या या अपघात कालावधीतील दीर्घकालीन उपचाराने पवित्र कुराणासोबत माझा असा सखोल पुनर्परिचय घडवून आणला. (३१०३५)

**ॲड.लखनसिंह कटरे,**
**बोरकन्हार-४४१९०२,**
**जि.गोंदिया.**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भूमिपूजन सप्टेंबर महिन्यात

**गोंदिया-** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहण्यासंदर्भात खासदार सुनील मेंढे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांची भेट घेत निमंत्रण दिले. यावेळी मंत्री महोदयांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आश्वासनही दिले.

सुरू असलेल्या अधिवेशनादरम्यान खासदार सुनील मेंढे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांची संसद भवनातील कार्यालयात भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी त्यांनी गोंदिया जिल्ह्यातील कुडवा येथे निर्माण केल्या जाणऱ्या गोंदिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत भूमिपूजन सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण पत्राद्वारे मंत्री महोदयांना दिले. या इमारतीचा भूमिपूजन सोहळा आपल्या शुभहस्ते व्हावा, ही इच्छा करून आपल्या व्यस्ततेतून वेळ काढून दहा ते वीस सप्टेंबर दरम्यान होऊ घातलेल्या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहावे असा आग्रह खासदारांनी मंत्री महोदयांकडे धरला. यावेळी मंत्री मनसुख मंडवीय यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

## जागतिक आदिवासी दिनी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन

**गोंदिया:** ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. हा दिवस भारतातील समग्र आदिवासी समाजासाठी अस्मितेचा व आत्मसन्मानाचा दिवस आहे. या निमित्ताने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी तसेच सर्व आदिवासी सामाजिक संघटना ता. देवरीच्या वतीने मिनी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन ९ ऑगस्ट २०२३ रोजी, बुधवारला सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

# मंडल दिवस चिरायू होवो!

७ ऑगस्ट म्हणजेच ओबीसी साजरा करतात तो मंडल आयोग दिन. होय, हा दिवस म्हणजे ओबीसी साठी सणोत्सवासारखा झालाय अलिकडे. पोळा बलिप्रतिपदा ओनम बिहू बेंदूर नागपंचमी वा मूळनिवासी अवैदिकांच्या इतर उत्सवांपेक्षाही काकणभर अधिक लोकप्रिय मंडल दिन. भारतीय खंडात सर्वदूर पसरलेल्या एवढ्या मोठ्या ओबीसी समूहाचा हा मुक्तीदिवस. होय, ओबीसीला आरक्षण मिळाले अन् ओबीसी अस्मिता मूळ धरु लागली या दिवसापासून. तीस वर्षापूर्वी मा. व्ही.पी. सिंग हे प्रधानमंत्री ओबीसीचे मसिहा ठरले. कमंडलधारी अधर्मी कुपमंडूकांना ते बधले नाही. मंडलसाठी सरकार पडले तरी पर्वा नाही केली व्हीपींनी. नंतर ओबीसी चळवळीच्या मुखंडांनी प्राणपणाने हा दिवस मंडलदिन म्हणून अनोख्या पद्धतीने साजरा करत ओबीसींच्या विविध समस्या, मागण्या, ओबीसीच्या दैनावस्थेचे मंथन चिंतन विमर्शन सुरू झाले. ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, नोकरीत आरक्षण, शैक्षणिक आरक्षण, क्रिमिलेयर यासंबंधी येणाऱ्या अडचणी ओबीसींना नवी ओळख देणाऱ्या ठरल्या. पण धर्माच्या नावाखाली वर्णजातीव्यवस्थेत ओबीसींना दिलेले शूद्रत्व, दुय्यम स्थान ओबीसींचे कमालीचे नुकसान करणारे, अन्यायकारक आहे ही विचार प्रक्रिया ओबीसीत सुरु झाली. आरक्षण म्हणजे गरीबी दूर करण्याचा कार्यक्रम नसून जातीव्यवस्थेने पिढ्यानपिढ्या शिक्षण शासन प्रशासन आणि समाजातील प्रतिष्ठित मोक्याची पदं, निर्णय प्रक्रिया यंत्रणेत प्रतिनिधित्व होय. या आकलनामुळे ओबीसी



आपली मूळ संस्कृती शेती श्रम कृषमायेशी निगडीत जीवनपद्धतीत शोधू लागले. वैदिकांनी केलेले तिचे ब्राम्हणीकरण, त्यातून ओबीसीवर लादलेली धार्मिक गुलामी या अनुषंगाने सिंधु संस्कृती पासून, आर्य आक्रमणापासून सूरू झालेला आर्य-अनार्य संघर्ष, वैदिक- अवैदिक, वामन -बळी, बळीवंश, वैदिक-लोकायत, वैदिक -जैन, बुद्ध, धर्ममार्तंड-संतपरंपरा, क्रांती-प्रतिक्रांती, इथपासून तर ब्राह्मण-ब्राम्हणेतर संघर्ष यात ओबीसीचा सांस्कृतिक वारसा आता दिसतो आहे.

या दिवसाचे महत्व ओबीसींना अधिक यासाठी वाटत आहे, कारण मंडलनंतरच्या काळात ओबीसी जागरण मोठ्या प्रमाणात झाले. ओबीसी वर अन्याय कारक ठरलेलं उच्चजातीय वर्चस्व झुगारुन दिल्याशिवाय पर्याय नाही ही सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीची कार्यप्रणाली ओबीसींना खुणावत असताना ओबीसीमधील विविध जातीच्या जातसंघटनाही उदयास येऊन अवमान कारक जातीव्यवस्थेतील त्यांना मिळणारे स्थान नाकारले जाऊन प्रबोधनाकडे झुकलेल्या दिसतात. पुरोहिताशिवाय सामाजिक कार्य लग्नादि धार्मिक विधी करण्याची सत्यशोधकी परंपरा स्वीकारुन कार्य करणे ही बाब खूप महत्त्वपूर्ण होय. त्यामुळे ब्राम्हणी वर्चस्व फेकून देऊन जातीव्यवस्थेने लादलेले दास्यत्व नाकारता येते. धर्मग्रंथात ओबीसींना ज्या पद्धतीने अधिकार वंचित ठेवले, ते अधिकार प्राप्तीसाठी हा संघर्ष होय. या टप्प्यावर आलेला हा ओबीसी लढा जातीजनगणनेच्या मागणीने आणखी समृद्ध होत आहे. म्हणून सत्ताधारी नेतृत्व ओबीसींना काही दिल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ओबीसींना जाणवते आहे. कारण ओबीसी समूह आणि शेतकरी एकदा पेटला की कुणाचीही मुलाहिजा करणार नाही. हे ओबीसी विरोधक उत्तमपणे जाणून आहेत.

ओबीसी आंदोलकांचा मंडलदिवसाच्या निमित्ताने वाढलेला उत्साह या व्यवस्थेला धडकी भरणारा वाटला पाहिजे. जय ओबीसी हा नारा आता भारतभर गूंज उठवत, "आधा नही पुरा करो मंडल आयोग लागू करो" या मागणीला नवी ऊर्जा देणारा आहे. हा ओबीसीचा महोत्सव आज साजरा होत असताना मंडलदिनाच्या ओबीसी शिलेदारांना अगणित सदिच्छा देऊ या. जय ओबीसी. जय जोतिबा...

**अनुज हुलके**

# गोंदिया रेल्वे स्थानकाच्या पुर्नविकासाचा शिलान्यास




**गोंदिया:** अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत मध्य रेल्वेच्या १५ आणि दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या १५ अशा एकूण ३० रेल्वे स्थानकांच्या अंत:बाह्य नुनतीकरणाच्या कामाचा शुभारंभ रविवारी (दि.६) पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडीओ कॉन्फ्ररसिंगच्या माध्यमातून केला. याप्रसंगी मोठ्या संख्येत राजकीय व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे यानंतर आता गोंदिया रेल्वे स्थानकाचे रुपडे पालटणार आहे.

अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत मुंबई-हावडा मुख्य रेल्वे मार्गावरील गोंदियासह दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे नागपूर मंडळांतर्गत वडसा, चांदाफोर्ट, इतवारी, कामठी, भंडारा रोड, तुमसर रोड, डोंगरगढ, राजनांदगाव, बालाघाट, नैनपूर, मंडल फोर्ट, सिवनी, आमगाव व छिंदवाडा अशा एकुण १५ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. अशाप्रकारे मध्य रेल्वेच्या १५ तर दपुमच्या १५ अशा एकूण ३० रेल्वे स्थानकांच्या अंत: -बाह्य नुतनीकरणाच्या कामाचा शुभारंभ रविवारी (दि.६) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फ्ररसिंगच्या माध्यमातून करण्यात आला.

यासाठी येथील रेल्वे स्थानकावर आयोजित आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार रमेश कुथे, संजय पुराम, माजी जि.प. अध्यक्ष नेतराम कटरे, भाजप जिल्हाध्यक्ष येशुलाल उपराडे, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, जनता बँकेचे अध्यक्ष दिनेश दादरीवाल, व्यापारी असोसिएशन अध्यक्ष संजय जैन, व्यापारी फेडरेशन अध्यक्ष किरण मुंदडा, जि.प. सभापती संजय टेंभरे, संघटन मंत्री संजय कुलकर्णी, सुनील केलनका, मोनिल जैन, सेवक कारेमोरे, जसपाल चावला, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी जगताप यांच्यासह विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत नागरिक उपस्थित होते. विशेष म्हणजे अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत गोंदिया रेल्वे स्थानकासाठी ३१ करोड रुपये मंजूर करण्यात आले असून याद्वारे रेल्वे स्थानकाचे अंतर्बाह्य नुतनीकरण केले जाणार आहे.

## अमृत भारत स्टेशन: पंतप्रधान दरेंद्र मोदी यंनी केली कामाला सुरुवात

### इंग्रज काळातील रेल्वे स्थानक

**डिसेंबर १९८८ मध्ये या लाईनचे परिचालन सुरु झाल्याने गोंदिया रेल्वे स्थानक तयार करण्यात आले होते. या लाईनला श्रेणी सुधारित करणे तसेच विस्तारित करण्यासाठी सन १८८७ मध्ये बंगाल-नागपूर रेल्वेचे (बीएनआर) गठन करण्यात आले होते. तसेच सन १९०२ मध्ये बीएनआरला गोंदिया ते जबलपूर तसेच नैनपूर ते मंडला सोबत नैनपूर ते सिवनी व छिंदवाडापर्यंत शाखा लाईनसह एक रेल्वे लाईन प्रदान करण्यासाठी अनुबंधित केले होते. या संपर्कातूनच गोंदिया विकसीत व समृद्धा झाला.**

### ही आहेत स्थानकावरील प्रस्तावित कामे

**अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत गोंदियाच्या परिचालनात दुरुस्ती होणार आहे. यातूनच स्थानकावर १२ मीटर रुंद फुट ओव्हरब्रिज, आकर्षक प्रवेशद्वार, पार्किंग, ॲप्रोच रोड, आतमध्ये प्रवाशांचा फलाटावर प्रशस्त जागा आणि वेटिंग हॉल, लिफ्ट, एस्केलेटर, इलेक्ट्रॉनिक कोच इंडिकेशन बोर्ड, स्वच्छतागृह आदी सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.**

# *तीन गावांना मुलभूत सुविधांची प्रतीक्षा*

## दैनंदिन सेवांची वाणवा: ना पोहोचली एसटी बस, ना लागले मोबाईल टॉवर

**गोंदिया:** देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना जिल्हा मुख्यालयापासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावरील तीन गावे मात्र उपेक्षिततेचे जीवन जगत आहेत. चारगाव, मोगर्रा, सिरपूर आणि या परिसरातील सुमारे १८ हजार नागरिकांना मूलभूत सुविधांपासूनच वंचित रहावे लागत आहे. या परिसरात अद्यापही एसटी बच पोहोचली नाही. मोबाईलचे टॉवर देखील नसल्याने नेटवर्क राहत नाही. लोकप्रतिनिधी केवळ निवडणुकांच्यावेळी आश्वासनांची खैरात करतात. त्यानंतर मात्र ते दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांचा आहे.

गोंदिया जिल्ह्याची निर्मिती होवून २४ वर्षाचा काळ झाला. मात्र अद्यापही जिल्ह्यात विकासकामे झाली नाहीत. त्याचे ज्वलंत उदाहरण मोगर्रा, सिरपुर, चारगाव आणि या परिसरातील इतर गावे आहेत. या तीन गावांची मिळून लोकसंख्या १८ हजारांच्या घरात आहे. या गावांनी अद्यापही एसटी बघितली नाही. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना तालुका मुख्यालयी शिक्षणासाठी सायकलने जावे लागते. उल्लेखनीय म्हणजे या मार्गावरुन एसटी धावत नाहीत मात्र तिन्ही गावांत एसटी निवारे आहेत. ते निवारे आता जनावरांचे निवारे झाले आहेत. गावांमध्ये मोबाईलचा टॉवर नेटवर्कच्या समस्या, तर वीज पुरवठा खंडित झाल्यास थेट दुसऱ्याच दिवशी सुरळीत होतो. संपूर्ण रात्र अंधारातच काढावी लागते. लोकप्रतिनिधी केवळ आश्वासन देऊन निघून जातात. निवडणुकीत मतांचा जोगवा मिळाल्यानंतर ते पुन्हा पाच वर्ष गावांकडे फिरकत देखील नसल्याचा आरोप होत आहे.

### इंटरनेटचा अभाव

**सध्याचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाचे असून मोबाईल हा जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. ई-पिक असो किंवा इतर कामे मोबाईलवरुन होतता. तसेच संभाषणासाठी मोबाईल गरजेचा आहे. मात्र या परिसरात नेटवर्क राहत नसल्याने मोबाईल केवळ शोभेची वस्तू ठवत आहेत.**

### विजेची समस्या कायम

**मोगर्रा, चारगाव, सिरपुर या गावांमध्ये विजेची समस्या कठिण झाली आहे. एकदा वीजपुरवठा खंडित झाल्यास थेट दुसऱ्या दिवशीच सुरळीत होतो. पावसाळ्याच्या दिवसात तर अवस्था त्याहून वाईट आहे. महावितरणणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.**
**उर्मिला पंधरे, सरपंच सिरपुर**

### विद्यार्थ्यांना त्रास

**सिरपुर, मोगर्रा, चारगाव येथील विद्यार्थी शिक्षणाकरिता तालुका मुख्यालयात जातात. मात्र बसची सुविधा नसल्याने त्यांना सायकलने १५ किलोमीटर अंतर कापून जावे लागत आहे. त्यामुळे तत्काळ एसटीची सेवा सुरु करणे गरजेचे आहे.**
**दिलीप मुंडेले, उपसरपंच मोगर्रा**

# भंडारा जि.प.पतसंस्थेची निवडणुकीचे वारे गरम



**गोंदिया:** गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीला २४ वर्षाचा काळ लोटत चालला आहे. मात्र अद्यापही संयुक्त भंडारा जिल्हा असताना जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेची व्याप्ती गोंदिया जिल्ह्यापर्यंत आहे. येत्या २० ऑगस्ट रोजी भंडारा जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेची निवडणूक होत आहे. यासाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सर्व संघटना कामाला लागल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात निवडणुकीचे वारे चांगलेच गरम होवू लागले आहेत.

भंडारा जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेची व्याप्ती गोंदिया जिल्ह्यापर्यंत आहे. गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेले जवळपास २२०० हून अधिक कर्मचारी या संस्थेचे सभासद आहेत. त्याचबरोबर संस्थेच्या संचालक मंडळामध्ये गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद मुख्यालयाचे मतदार संघ आहे. या पतसंस्थेच्या एकुण २० संचालक पदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. कार्यक्रमानुसार २० ऑगस्ट रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. उद्या नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. या पतसंस्थेच्या निवडणूक रिंगणात प्रामुख्याने दोन पॅनलमध्ये चुरशीची निवडणूक होणार? असे चित्र पहावयास मिळत आहे. या निवडणुकीच्या रिंगणात जि.प.च्या सर्व कर्मचारी संघटनांनी सहभाग घेतल्याचेही दिसून येत आहे. विशेष म्हणजे, पहिल्यांदाच या संस्थेची निवडणूक अत्यंत उद्या रिंगणातील उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार असले तरी गेल्या आठवडाभरापासून गोंदिया जिल्ह्यात जि.प. यंत्रणेत निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे.

**प्रचारसभांना ओल्या पार्टीचे स्वरूप**

यापुर्वी निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला होता. मात्र न्यायालयीन प्रक्रियेमुळे सदर कार्यक्रम स्थगीत करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा निवडणूक कार्यक्रम जाहिर होताच निवडणुकीचे वारे वाहू लागले. कार्यक्रम जाहीर होताच प्रचार अभियानाला वेग आले. कर्मचाऱ्यांच्या संघटनांचे पदाधिकारी तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार थेट कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचून प्रचारकामी लागल्याचे दिसून येत आहेत. एवढेच नव्हे तर तालुकास्थळी हॉटेलमध्ये प्रचारसभा आयोजित करुन मतदार सभासदांना आपल्याकडे वळविले जात आहे. त्यामुळे प्रचारसभांना ओल्या पार्टीचे स्वरूप आले आहेत.


# केवळ फलक लावून सारास संवर्धन होणार का?

**गोंदिया:** नामशेष होत चाललेल्या सारा पक्ष्यांची सर्वाधिक महाराष्ट्रात केवळ गोंदिया जिल्ह्यात अधिक आहे. लगतच्या भंडारा, बालाघाट जिल्ह्यातही सारस पक्षी वास्तव्यास आहे.मात्र या पक्ष्यांच्या संवर्धनाकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. दरम्यान, यची मुंबई उच्च न्यालयाच्या नागपूर खंडपीठाने दखल घेत प्रशासनाला फटकारल्यानंतर उपाययोजना सुरु केल्याचे दाखविले जात आहे. यासाठी प्रशासनाकडून गोंदिया तालुक्यात ठिकठिकाणी फलक लावून सारास संवर्धन केले जात असल्याचे भासविले जात आहे.

## उपाययोजनाकडे अद्यपही होतेय दुर्लक्ष

सारस हा पक्षी अत्यंत देखणा आणि शांत स्वभावाचा असा आहे. हा पक्षी राज्यातून नामशेष झाला असून केवळ गोंदिया, भंडारा जिल्ह्यात तसेच वैनगंगा नदीकाठच्या मध्य प्रदेशात आढळून येत आहे. पुर्वी अर्जुनी मोरगाव, गोंदिया तालुक्यातील काही भागात सारस आढळून येत होते. मात्र लुप्त होणाऱ्या सारस पक्ष्यांची सुरक्षा आणि संवर्धनाकडे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे या पक्ष्यांची संख्या रोडावली. गोंदिया तालुक्यातील झिलमिली, परसवाडा, घाटटेमनी, छिपीयासह इतर परिसरात सारस पक्षी दिसून येत आहेत.

सारस पक्ष्यांची संख्या कमी होण्यास प्रशासनाची भूमिका कारणीभूत असल्याची याचिका न्यायालयात दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने प्रशासनाचे कान टोचत पक्ष्यांचे अधिवासक्षेत्र आणि त्यांची संख्या वाढवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आरखडादेखील तयार केला. आता कृषी विभाग, वनविभाग, महावितरण आणि सामाजिक संस्थांकडे सोपविली आहे. त्यामुळे आता वनविभागदेखील सारस पक्ष्यांना घेऊन अलर्ट मोडवर आले आहे. विभागाने सारस अधिवास असलेल्या परिसरात जनजागृती सुरु केली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासह ठिकठिकाणी सारस संवर्धन आणि सारसांचे महत्व पवून देणारे फलक लावण्यात आले आहेत.



### जनजागृती ठिक, पण उपाययोजनांचे काय

**सारस संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात काहीही वावगे नाही. पण सारसांचे संवर्धन झाले पाहिजे यासाठी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी कधी करण्यात येणार हा महत्वाचा प्रश्न आहे. केवळ कागदावर उपाययोजना करुन काहीही साध्य होणार नसून प्रत्यक्षात फिल्डवर उपाययोजना करण्याची खरी गरज असल्याचे पर्यावरणप्रेमी सांगत आहे.**

### घोरपड शिकार प्रकरणात एका आरोपीस वन कोठडी

**अर्जुनी मोर** - तालुक्यातील वडेगाव स्टेशन सहवन क्षेत्रात घोरपडीचे शिकार करून मासा सहित आरोपीला पकडून कार्तिक ज्ञानीराम मडावी राहणार बुधेवाडा यास दिनांक १० ऑगस्ट पर्यंत वन कोठडी ठोठावण्यात आली आहे.गुप्त माहितीच्या आधारे वडेगाव सहवान क्षेत्राचे क्षेत्र सहाय्यक दिनेश बोरकर .यांनी ही कारवाई केली.




## राज्यात आरटीईच्या १९ हजार ३९४ जागा रिक्त

**मुंबई** : राज्यातील खासगी इंग्रजी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के जागा आरक्षित असून त्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी करण्यात आली होती. मात्र यंदा देखील मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असल्याचे यावेळी निदर्शनास आले आहे. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत यंदा १९ हजार ३९४ जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेद्वारे नियमित प्रवेश जाहीर झालेले विद्यार्थी आणि प्रतीक्षा यादीतील विद्यार्थी अशा एकूण ८२ हजार ४५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला.

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. यंदा ८ हजार ८२३ शाळांतील १ लाख १ हजार ८४६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी एकूण ३ लाख ६४ हजार ४१३ अर्ज दाखल झाले. प्रवेशासाठीच्या सोडतीतून ९४ हजार ७०० नियमित प्रवेश जाहीर करण्यात आला. नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी तीन फेऱ्या राबवण्यात आल्या. त्यात पहिल्या फेरीत १३ हजार ६६०, दुसऱ्या फेरीत ३ हजार ५८३, तिसऱ्या फेरीत एक हजार २५९ आणि चौथ्या फेरीत १८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यामुळे एकूण उपलब्ध जागांपैकी १९ हजार ३९४ जागा रिक्त राहिल्याचे संकेतस्थळावरील आकडेवारीवरून दिसून येत आहे.

# रस्त्यावरील मोकाट गुरांमुळे नागरिक पार त्रस्त

**तिरोडा:** गुरांमुळे रस्त्यावरुन ये-जा करताना वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुख्य रस्त्यावरुन ते गल्लीपर्यंत जनावरांची संख्या वाढत आहे.

रात्री वाहन चालवल्याने रस्त्यावर बसलेली गुरे अजिबात दिसत नाहीत. त्यामुळे वाहन चालक व जनावरेही गंभीर जखमी होतात. अशात नगर परिषदेने मोहीम राबविणे गरजेचे झाले असून गुरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. शहरातील प्रत्येकच भगात मोकाट गुरांची संख्या वाढली आहे. रस्त्याचऱ्या मधोमध गुरे बसून राहतात. अशात वाहनचालकांना ये-जा करताना त्रास होतो. रात्री गुरे दिसून आली नाही तर अपघातही घडले आहेत. रस्त्यावर फिरणारी गुरे ही बहुतेक पाळीव आहेत. मालक फक्त दुध काढण्यासाठी घरी घेऊन जातो आणि नंतर मोकळे सोडतो. परिणामी मुख्य रस्त्यावर गुरे येऊन बसतात. परिणामी वाहतूक विस्कळीत होते. अनेक वेळा अपठात होऊनही गुरे घेण्यासाठी मालक येत नाही. ही समस्या सोडविण्यासाठी नगर परिषदेने मोहिम राबविण्याची मागणी केली जात आहे. अनेक वेळा नगर परिषद व तहसीलदारांना निवेदन देऊन कळविले आहे. मात्र योग्य ती कारवाई होत नसल्याने वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.



**मालकांवर दंडात्मक कारवाई करा**

मोकाट फिरणारी गुरे पाळलेली आहेत. मात्र त्यांचे मालक त्यांना घरी बांधून ठेवत नसल्याने ती शहरात सर्वत्र फिरत असतात. अशात मालकांवर नगर परिषदेने दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी शहरवासी करीत आहेत. नगर परिषदेने कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# प्रत्येक गावात बचत गट भवन होणार-ॲड. माधुरी रहांगडाले




**तिरोडा:** बचत गटाचे कामे करुन महिला सक्षम होणार नाही. तर त्यासाठी महिलांनी लघु उद्योग उभारावे. या कामासाठी तेजश्विनीचे अधिकाऱ्यांनी महिलांसाठी योजना करुन आर्थिक बाजू कशूी मजबूत होईल, याकरिता प्रयत्न करावे, ठनेगाव क्षेत्रात लवकरात लवकर गावनिहाय बचत गट भवन तयार करण्यासाठी प्रयत्न करणार, असे जि.प.सदस्य ॲड. माधुरी रहांगडाले यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषद ठाणेगाव निहाय बचत गट प्रशिक्षणाचे आयोजन कुंभारे लॉन येथे ३ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पुढे बोलताना ॲड. रहांगडाले यांनी गाात होणाऱ्या मासीक सभेत महिलांनी सहभागी व्हावे, सभांच्या माध्यमातून शासनाच्या योजनांची माहिती होवून लाभ देण्यात मदत होते. करीता आपल्यासाठी असलेल्या केंद्र व राज्य सरकारच्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ही केले. या कार्यक्रमाला बचत गटातील महिला, तेजस्विनीचे अधिकारी उपस्थित होते.

# रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ता

## खातिया-कामठा मार्गाची दुरवस्था: रस्ते दुरुस्तीची नागरिकांची मागणी



**गोंदिया:** तालुक्यातील खातिया ते कामठा या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरुन वाहने चालविणे कठीण झाले आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नेमके रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ता असा प्रश्न या मार्गावरुन ये-या करणाऱ्या नागरिकांना पडत आहे. अद्यापही संबंधित विभागाने याची दखल घेऊन खड्डे बुजविलेले नाही. त्यामुळे या परिसरातील गावकऱ्यांची समस्या कायम आहे.

गोंदिया तालुक्यातील खातिया ते कामठा या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे मागील काही दिवसांपासून अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. रस्त्यावरील खड्डे बुजवून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी अनेकदा परिसरातील गावकऱ्यांनी संबंधित विभागाकडे केली. त्यांची याची अद्यापही दखल घेतली नाही. त्यामुळे अपघाताची मालिका कायम आहे. काही नागरिकांनी अपघात होऊ नये यासाठी मोठमोठे खड्डे श्रमदानातून बुजविले. माजी सरपंच केशोराव तावाडे, वीरेंद्र मानकर व काही गावकऱ्यांनी स्वखर्चातून मुरुम टाकून खड्डे बुजविले होते. पण, या मार्गावर सतत वर्दळ राहत असल्याने रस्त्यावर पुन्हा खड्डे पडले आहेत. रावणवाडी येथील मुख्य त्रिमुर्ती चौक येथील खड्डे ग्रामपंचायतीने बुजविले. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येतो. त्यामुळे या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीची जवाबदारी या विभागाची आहे. मात्र, या विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आणखी किती दिवस खड्ड्यातून प्रवास करायचा, असा सवाल या परिसरातील गावकऱ्यांनी केला आहे. सद्या पावसाळ्याचे दिवस असून पावसाचे पाणी खड्ड्यात साचून राहत असल्याने या मार्गावरील प्रवास आता जीवघेणा झाला असून मोठे वाहन जवळून गेल्यास खड्ड्यातील घाण पाणी ये-जा करणाऱ्यांच्या अंगावर जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप पसरले आहे.



### अपघातांची मालिका कायम

**खातिया ते कामठा मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. परिणामी, वाहनचालकांना या रस्त्यावर ये-जा करताना मोठी कसरत करावी लागेत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यात साचल्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज बसत नाही. परिणामी, त्यांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. आता तर दररोज अपघात घडत असल्यामुळे अपघातांची मालिकाच सुरु झाली असल्याचे बोलले जात आहे.**

### शहरात खड्ड्यांनीच होत स्वागत

**गोंदिया-आमगाव मार्गावरील जिल्हा परिषद कार्यालय परिसरतील सारस चौकात खड्ड्यांचे जाळे तयार झाले असून गोंदिया शहाचा हा प्रवेशद्वार मानला जातो. मात्र या खड्ड्यांमुळे शहरात प्रवेश करणाऱ्यांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागतो. एकंदरीत शहरात येणाऱ्यांचे हे खड्डेच स्वागत करीत असल्याचे दिसून येत आहे.**

# मंडल यात्रेचे देवरीत झाले उत्साहात स्वागत



**देवरी:** येथे ओबीसी समाजाच्यावतीने मंडल यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच शाळा, महाविद्यालयामध्ये प्रबोधन सभेचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात आले.

७ ऑगस्ट मंडल दिनाचे औचित्य साधून ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाजाच्यावतीने ३० जुलैपासून संपूर्ण विदर्भात मंडल यात्रा काढण्यात आली आहे. मंडल यात्रा टप्पा-टप्प्याने विदर्भातील जिल्हे, तालुके फिरणार असून गोंदियाल, आमगावनंतर १ ऑगस्ट रोजी देवरी येथे यात्रेचे आगमन झाले. या यात्रेत ओबीसी समाजातील वरिष्ठ व्यक्तींचा खास सहभाग दिसून आला. यावेळी शाळा, महाविद्यालयामध्ये प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर यात्रेचे संयोजक उमेश कोराम यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता महाज्योती संस्थेच्या योजनांची माहिती देत शासनाने शंभर कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. याबरोबरच ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे, स्वधार योजना, व्यावसायीक अभ्यासक्रमात शंभर टक्के फी माफी करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दिनानाथ वाघमारे, प्रा. अनिल डाहके उपस्थित होते.

यात्रेची सुरुवात मनोहरभाई पटेल महाविद्यालयापासून करण्यात आली. त्यानंतर मनोहरभाई कनिष्ठ महाविद्यालय, के.एस.जैन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रबोधन सभेत शैक्षणिक जनजागृती करण्यात आली.

यात्रेच्या प्रस्थानपुर्वी यात्रेकरुंनी माँ धुकेश्वरी मंदिर येथे विश्रांती घेत अल्पोहार घेतल्यानंतर यात्रा सडक अर्जुनीकडे रवाना झाली. यात्रेचे स्वागत ओबीसी समाज देवरीच्यावतीने करण्यात आले. यावेळी माजी जि.प.सदस्य राजेश चांदेवार, कृष्णा ब्राम्हणकर, ईश्वर बारसे, रघुराम वाडीभस्मे, मेघनात भांडारकर, कैलाश वैद्ये, नंदकिशोर बारसे, मुनेश्वर गहाने, चंदू राऊत, गजानंद दिघोरे, प्रा. सुनंदा भुरे, अश्विनी मते, सुनीता फुंडे, भूमिता ब्राम्हणकर प्रामुख्याने उपस्थित होते.

# लोकसभेसाठी काँग्रेसने थोपटले दंड

## राऊत, वडेट्टीवार,कांबळे, यशोमती ठाकूर यांच्याकडे विदर्भाची जबाबदारी





**नागपूर:** कर्नाटकातील विजय आणि राहूल गांधी यांना खासदारकी बहाल केल्यानंतर काँग्रेसजणांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आता पक्ष निवडणूक मोडवर आलेला आहे. या पार्श्वभुमीवर आगामी लोकसभा निवडणुकीपुर्वी काँग्रेसची ३ ऑगस्टला मुंबईत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीच्या निमित्ताने काँग्रेसने दंड थोपटत हम भी है तैयारची घोषणा केली आहे. भाजपला धोबीपछाड देण्यासाठी महाराष्ट्रातील लोकसभेच्या सर्व ४८ जागांसाठी १९६ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विदर्भातील मतदार संघाची धूरा माजी मंत्री नितीन राऊत, सुनील केदार, यशोमती ठाकुर, विजय वडेट्टीवार, रणजित कांबळे यांच्यासह अन्य नेत्यांकडे सोपविली आहे. राज्यातून केवळ धानोरकरच आले होते. विदर्भ यापुर्वी कायमच काँग्रेसचा गढ राहिला आहे. मात्र, गत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत अख्ख्या महाराष्ट्रातून काँग्रेसला केवळ चंद्रपूरची एकच जागा निवडून आणता आली. येथे काँग्रेसचे बाळू धानोरकर यांनी भाजपचे हंसराज अहीर यांचा पराभव करीत विजय मिळविला होता. मात्र धानोरकर यांचे निधन झाल्याने सध्या ही जागा रिक्त आहे. आगामी निवणुकीत काँग्रेसला अस्तित्व कायम राखण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतील. त्यादृष्टीनेच काँग्रेसचे आतापासूनच तयारी सुरु केली आहे.

माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार यांच्याकडे लातूरचे पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माजी मंत्री वसंत पुरके यांच्याकडे नंदूरबार व धुळेचे पर्यवेक्षक सुनील देशमुख यांच्याकडे जळगाव व रावेरचे पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी सोपविली गेली आहे. हुसेन दलवाई यांची संगलीचे पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### मतदार संघ पर्यवेक्षक समन्वयक

रामटेक - विजय वडेट्टीवार, रवींद्र दरेकर
नागपूर - विजय वडेट्टीवार, वीरेंद्र जगताप
भंडारा-गोंदिया - विजय वडेट्टीवार, राजा तिडके
गडचिरोली-चिमूर- नितीन राऊत, नामदेव किरसान
चंद्रपूर - नितीन राऊत, मुजीब पठाण
बुलडाणा - यशोमती ठाकूर, नाना गावंडे
अकोला - यशोमती ठाकूर, श्याम उमाळकर
अमरावती - रणजित कांबळे, किशोर गजभिये
वर्धा - सुनील केदार, जिया पटेल
यवतमाळ-वाशीम - सुनील केदार, संजय राठोड

### पदाधिकारी विदर्भाच्या दौऱ्यावर

**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठकीत पदाधिकाऱ्यांना तयारीला लागण्याची सुचना केली. नियुक्त पर्यवेक्षक समन्वयकांनी स्थानिक पातळीवरील राजकीय स्थितीची सविस्तर माहिती घ्यावी. सोबतच स्थानिक जिल्हाध्यक्षांसोबत समन्वय साधून ७ ते १४ ऑगस्ट दरम्यान ठरवून दिलेल्या लोकसभा मतदार संघात विधानसभा निहाय दौरा व बैठकीचे नियोजन करावे. संबंधित मतदार संघातील विद्यमान आणि माजी खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी, जिल्ह्याचे पदाधिकारी, ब्लॉक अध्यक्ष, आघाड्या तसेच विविध सेलचे पदाधिकाऱ्यांनाही बैघकीसाठी बोलवून घ्यावे. निवडणुकीच्या दृष्टीने आतापासूनच कामाला लागण्याची सुचनाही त्यांनी केली.**

# शेंडा सहवनक्षेत्रात वनविभागाची कारवाई, तीन लाखांचा माल जप्त

## सहा जणांना घेतले ताब्यात: तीन ट्रॅक्टर लाकूडफाटा केला जप्त



**सडक अर्जुनी:** तालुक्यातील शेंडा सहवनक्षेत्रांतर्गत येणाऱ्या कोयलारी येथे वनविभागाने धाड टाकून अंदाजे ३ लाख १२ हजार रुपयांचा तीन ट्रॅक्टर लाकूडफाटा जप्त केला. याप्रकरणी सहा जणांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई रविवारी (दि.६) करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार वनविभाग व वनविकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर वनविकास महामंडळ जांभळी दोडके व वनपरिक्षेत्र कार्यालय सडक अर्जुनी अंतर्गत कोयलारी परिसरात रविवारी सकाळी धाड टाकली. यावेळी जांभळी वनविकास महामंडळातील ४ सागवान नग ०.२७ घनमीटर सागवान जप्त करण्यात आले. तर शेंडा सहवनक्षेत्रातील १४२ सागवान नग यात ६.४२४ घनमीटर सागवान जप्त करण्यात आले. एकुण सागवानची किंमत ३ लाख १३ हजार ५६८ रुपये असल्याचे सांगण्यात आले. जंगलात अवैध वृक्षतोड करुन आरोपींनी लाकूडफाटा शेतशिवारात ठेवला होता. तर काही लाकूडफाटा हा घरातूनही जप्त करण्यात आला.

दरम्यान, एकाचवेळी कारवाई करुन जवळपास तीन ट्रॅक्टर लाकूडफाटा जप्त केला आहे. याप्रकरणी सहा जणांना ताब्यात घेतले आहे. रविवारी सकाळी ६ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कारवाई करण्यात आली. जप्त केलेला माल डोंगरगाव डेपो येथे जमा करण्यात आला आहे.

### मागील काही दिवसांपासून होती ओरड

**सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा कोयलारी, पांढरी परिसरातील जंगलात मागील काही दिवसांपासून अवैध वृक्षतोड सुरु असल्याची ओरड सुरु होती. त्यानंतर वनविभागाने कारवाई करुन मोठ्या प्रमाणात लाकूडफाटा जप्त केल्याने यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**

### यांनी केली कारवाई

**उपवनसंरक्षक अधिकारी प्रमोद पंचभाई यांच्या मार्गदर्शनात वनविकास महामंडळाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश डोंगरवार, नंदेश्वर, सडक अर्जुनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश जाधव, क्षेत्र सहायक नितेश राठोड, नंदनाथ मुंडकर, संतोष घुगे, गजानन सयाम, फिरोज पठाण, शेंडे वनरक्षक मनमाल आगासे यांनी ही कारवाई केली.**

# गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्वपूर्ण बैठक संपन्न



**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेस भवन रेलटोली, कार्यालय गोंदिया येथे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयाकडून मागविण्यात आलेले शपथपत्र गोंदिया जिल्हा कार्यालयाला सादर करण्याच्या संदर्भात आढावा बैठक माजी आमदार श्री राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष श्री गंगाधर परशुरामकर, जिल्हा बूथ प्रमूख श्री नरेश माहेश्वरी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

जिल्ह्याच्या विकासासाठी व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नवीन लोकांना पक्षाशी जोडण्याचे कार्य करावे असे प्रतिपादन माजी आमदार श्री राजेंद्र जैन यांनी केले. यावेळी तालुका निहाय्य शपथपत्र जमा करण्या संदर्भात आढावा घेण्यात आला व शिल्लक शपथपत्र लवकरात लवकर जिल्हा कार्यालयाला जमा करण्याचे निर्देश जिल्हाध्यक्ष श्री गंगाधर परशुरामकर यांनी केले.

या बैठकीला सर्वश्री राजेंद्र जैन, गंगाधर परशुरामकर, नरेश माहेश्वरी, यशवंत गणवीर, सुरेश हर्षे, प्रभाकर दोनोडे, राजलक्ष्मी तुरकर, केतन तुरकर, केवल बघेले, रविकांत बोपचे, डॉ.अविनाश काशीवार, सी के बिसेन, लोकपाल गहाणे, किशोर तरोणे, मोहनलाल पटले, बाळकृष्ण पटले, अशोक शहारे, कमलबापू बहेकार, जगदीश बावनथडे,कल्पना बहेकार, किरणताई कांबळे, नीता रहांगडाले, उषा रामटेके, राजेश भक्तवती, रवीकुमार पटले, महेंद्र चौधरी, सुरेश चुटे, कृष्णकुमार जैस्वाल, एकनाथ वहिले, रामाजी बिसेन, दिलीपकुमार बिसेन, रिताराम लिल्हारे, चंदन गजभिये, पुरण उके, पंकज चौधरी, मोनू मेश्राम, राज शुक्ला, त्रिलोक तुरकर, रौनक ठाकूर, हर्षवर्धन मेश्राम, आरजू मेश्राम, कान्हा बघेले, वामन गेडाम, नरेंद्र बेलघे सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# कृषी सभापतींच्या असभ्य वागणुकीचा विभाग प्रमुखांद्वारा सामुहिक निषेध

## जाहीर माफी न मागितल्यास यापुढे होणाऱ्या सभेवर बहिष्कार



**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या २६.०७.२३ दिनांक रोजी पार पडलेल्या स्थायी समितीच्या सभेत शिक्षण विभागातील विषयांवर चर्चा सुरू असताना अचानक जिल्हा परिषदेचे कृषी व पशसंवर्धन सभापती सोनू कुथे यांनी प्राथमिक विभागांचे शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये यांना असभ्य भाषेत बोलून अपमानजनक वागणूक दिली. त्यामूळे या बाबीचा निषेध करत गोंदिया जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांना निवेदन दिले. तथा यात सभापती यांनी जाहीर माफी मागावी तसेच यापुढे असे प्रकार होणार नाहीत याची ग्वाही द्यावी अन्यथा यापुढे होणाऱ्या कुठल्याही सभेत जिल्हा परिषदेचे कोणतेही विभागप्रमुख उपस्थित राहणार नाहीत असा सज्जड इशारा सर्व विभाग प्रमुखांनी दिला. तसेच सदर निवेदनाची एक प्रत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाला सुद्धा पाठविण्यात आली असल्याची माहिती विभागप्रमुख यांनी दिली.

यावेळी जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर, गोविंद खामकर उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत, कादर शेख शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,संजय गणवीर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, डॉ नितीन वानखेडे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ महेंद्र गजभिये शिक्षणाधिकारी प्राथमिक इत्यादी उपस्थित होते.

# तुमखेडा खु. येथे सभामंडप बांधकामाचा शुभारंभ

**गोंदिया:** तालुक्यातील तुमखेडा खुर्द येथील स्मशानभुमी येथे आमदार विनोद अग्रवाल यांच्या स्थानिक निधीतून सभामंडप बांधकामाचे भूमिपूजन पं.स.सभापती मुनेश रहांगडाले यांच्या हस्ते रविवार (दि.६) ऑगस्ट रोजी पार पडले.

याप्रसंगी तुमखेडा खु.सरपंच आशीष हत्तीमारे, माजी पं.स.सदस्य शेखर वाढवे, उपसरपंच लक्ष्मण मंडीये, सेवा सहकारी संस्था अध्यक्ष निलेश्वर कोरे, माजी ग्रा.पं.सदस्य सुरेश मचाडे, माजी उपसरपंच प्रल्हाद बनोटे, योगेश मचाडे, सोमनाथ कोरे, धर्मेश नागपुरे, दुर्गेश लिल्हारे, धनराज रणगीरे, विजय देशकर, दिनेश लाडे आणि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.



# आज आदिवासींची महापंचायत व महाआक्रोश रॅली

**गोंदिया.** मणिपूर राज्यातील आदिवासींवरील अत्याचार आणि मध्य प्रदेशातील आदिवासी तरुणांवर झालेल्या कृत्यांच्या निषेधार्थ गोंदियाच्या इतिहासात प्रथमच ९ ऑगस्ट रोजी महापंचायतीचे आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान महाआक्रोश रॅली काढण्यात येणार आहे. आदिवासी समाज बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन पीपल्स फेडरेशन संघटनेचे अध्यक्ष करण टेकाम यांनी केले आहे.

या आक्रोश रॅली यशस्वी करण्यासाठी आदिवासी समाजातील बांधवांनी सकाळी ११ वाजता इंदिरा गांधी स्टेडियमवर येणार आहे. मणिपूर राज्यात आदिवासी महिलांवरील अत्याचार, मध्य प्रदेश राज्यात एका आदिवासी तरुणावर लघवी केल्याची घटना समोर आली होती. तसेच आदिवासींवरील अन्याय, अत्याचाराची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. गोंदियाच्या इतिहासात प्रथमच आदिवासी संघटनांनी अन्याय व अत्याचाराच्या निषेधार्थ स्थानिक आंबेडकर भवन मरारटोली येथे महाआक्रोश रॅलीसह महापंचायतीचे आयोजन केले गेले होते. या महापंचायतीच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे असतील. उद्घाटन कृषी अधिकारी धनराज तुमडाम यांच्या हस्ते होणार आहे. दीपप्रज्वलन नॅशनल ट्रायबल पिपल्स फेडरेशनचे कार्याध्यक्ष एन. डी. किरसन, आमदार सहसराम कोरोटे, सरचिटणीस दुर्गाप्रसाद कोकोडे, माजी आमदार संजय पुराम यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी निवृत्त न्यायमुर्ती प्रकाश धुर्वे, मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे,राजकुमार पुराम, जिल्हा खनिकर्म अधिकारी सचिन आधे, वाय.सी. भोयर, प्रख्यात लेखक उषाकिरण आत्राम आदी उपस्थित राहणार आहेत.

# जि.प.च्या तलावावरील अतिक्रमण काढणार

## जि.प.च्या सर्वसाधारण सभेत ठराव केला पारीत: अंमलबजावणीकडे लागले लक्ष



**गोंदिया:** शहरातील छोटा गोंदिया परिसरात जिल्हा परिषदेच्या मालकीचे दोन तलाव आहेत. आजघडीला त्या तलावांना बोडीचे स्वरूप आले. त्या तलावाचे पुनरुज्जीवन करुन सौंदर्यीकरण करण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मालकीची मोठ्या प्रमाणात संपदा आहे. मात्र त्या भुखंडाकडे जि.प.चे कायम दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे अनेकांनी त्या भुखंडावर अतिक्रमण करुन जागा बळकावल्या आहेत. काही सदस्य अनेक वर्षापासून हा मुद्दा मांडत असताना अद्यापही त्या जागा अतिक्रमण मुक्त करण्यात आल्या नाहीत. गोंदिया शहरातील छोटा गोंदिया परिसरात देखील दोन तलाव आहेत. त्या तलावांना चारही बाजूंनी परिसरातील नागरिकांनी अतिक्रमण केले. तसेच अनेक वर्षापासून तलावांची स्वच्छता झाली नसल्याने गाळ साचून तलाव बुजण्याच्या मार्गावर आहेत. काही भूमाफियांची नजर त्या तलावांवर असून तलाव बुजवून त्या जागा बळकावण्याचा प्रयत्न होत आहे. हा विषत लक्षात येतच जनशक्ती सामाजिक संघटनेने जिल्हा परिषद अध्यक्षांना भेटून तलावांचे सौंदर्यीकरण करण्याची मागणी केली होती. अध्यक्षांनी सर्वसाधारण सभेत हा विषय मांडला. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रस्ताव तयार करुन तलावांचे सौंदर्यीकरण करण्याचे निर्देश दिले. आता याची अंमलबजावणी केव्हा होते याकडे लक्ष लागले आहे.

### पुनरुज्जीवनासाठी उचलले पाऊल

**शहरात जिल्हा परिषदेच्या मालकीचे दोन तलाव आहेत. त्या तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी जिल्हा परिषदेने पाऊल उचलले आहे. अध्यक्षांनी या विषयाला गांभीर्याने घेतले आहे. सौंदर्यीकरण आणि खोलीकरणाचा प्रस्ताव आहे.**

**यशवंत गणवीर, उपाध्यक्ष जि.प.**

# विकासाची गंगोत्री असीच सुरु राहणार :ईजी.राजकुमार बडोले



**अर्जुनी मोरगाव:** अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्र हा वैभव संपन्न आहे. अनेक तीर्थक्षेत्राने व्याप्त असलेल्या या क्षेत्रात धार्मिकतेचा सुगंध सदैव दरवडत असतो. तालुक्यात नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यानासह प्रतापगड तिर्थक्षेत्र, बोंडगावदेवी तिर्थक्षेत्र नावारुपाला आलेली आहेत. त्यामुळे तिर्थक्षेत्र स्थळांचा विकास हे आपले प्रथम प्राधान्य आहे. सोबतच या क्षेत्राला नैसर्गिक सौंदर्य सुध्दा लाभलेले आहे. पर्यटन स्थळांचा विकास सुध्दा आपले लक्ष आहे. सन २००९ ते २०१९ पर्यत आपन आमदार व मंत्री असतांना सर्वाधिक निधी या विधानसभाक्षेत्रात आणुन सर्वांगीण विकास केला. प्रत्येक गावात विकासाची गंगोत्री आणली. आता पदावर नसलो तरी विकासाची नाळ जुडवून ठेवल्याने आपण करोडो रुपयांचा निधी आणून या विधानसभेचा विकास करण्यासाठी तत्पर आहोत. या क्षेत्रातील जनतेने मतभेद बाजूला सारुन विकास कामासाठी एकत्र येण्याची गरज आहे. मी आपल्या पाठीशी सदैव उभा आहे. असे आवाहन राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री इंजि. राजकुमार बडोले यांनी केले.

अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील बोरटोला, बोंडगावदेवी, चान्ना येथे तारीख सात ऑगस्ट रोजी विविध विकास कामाच्या भूमिपूजन प्रसंगी भूमिपूजक म्हणून बोंडगावदेवी ग्रामपंचायत मध्ये आयोजित छोटे खानी सभेत ईजी. राजकुमार बडोले बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद चे गटनेते व जिल्हा परिषद सदस्य लायकराम भेंडारकर होते .यावेळी पंचायत समिती सदस्य संदीप कापगते, कुंदाबाई लोगडे ,बोंडगाव देवीच्या सरपंच प्रतिमा बोरकर, ग्रामपंचायत सदस्य डॉ. श्यामकांत नेवारे, अमरचंद ठवरे, श्रीकांत बनपूरकर, राधेश्याम झोडे, सौ मेश्राम, भाजपाचे तालुका महामंत्री भोजराम लोगडे, लैलेश शिवणकर, पुरुषोत्तम डोये, चान्ना चे सरपंच सचिन डोंगरे, उपसरपंच मोरेश्वर सोनवाणे, बोरटोला चे सरपंच कुरुंदाबाई वैद्य, उपसरपंच काशिनाथ कापसे, ग्रामपंचायत सदस्य दीपंकर ऊके तिन्ही गावचे ग्राम पंचायतचे सर्व सदस्य व ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते.

माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे विशेष मार्गदर्शनात जिल्हा परिषद सदस्य लायकराम भेंडारकर यांनी ही कामे मंजूर करून घेतली आहे. यामध्ये बोरटोला येथे मग्रारोहयो अंतर्गत वीस लाखाचा गाव अंतर्गत सिमेंट रस्ता, चान्ना येथे मग्रारोहयो अंतर्गत वीस लाखाचा गाव अंतर्गत सिमेंट रस्ता, तर बोंडगावदेवी येथे मग्रारोहयो अंतर्गत वीस लाखाचा गाव अंतर्गत सिमेंट रस्ता, तर २५-१५ अंतर्गत पाच लाखाचा सिमेंट रस्ता या बांधकामाचे भूमिपूजन माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य लायकराम भेंडारकर यांनीही बोंडगाव देवी जिल्हा परिषद क्षेत्रासाठी खासदार सुनील मेंढे. माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या प्रयत्नाने तथा जिल्हा निधी व विविध योजनेतून विकास साधण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीत आहे. यापुढेही क्षेत्राच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. त्यामुळे क्षेत्राचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे सांगितले. सभेचे प्रस्ताविक ग्रामपंचायत सदस्य अमरचंद ठवरे, संचालन ग्रामसेवक डी.डी. लंजे तर आभार प्रदर्शन श्रीकांत बनपूरकर यांनी केले भूमिपूजन कार्यक्रमाला तिन्ही गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन



**अर्जुनी मोरगाव:** विधानसभा क्षेत्रातील अर्जुनी मोरगाव मतदार संघाचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या प्रयत्नातून वेगवेगळ्या योजनेमधून अर्जुनी / मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध, कान्होली, जांभळी/ये, बाराभाटी या गावामध्ये विविध विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत. या कामाचे भूमिपूजन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.

यामध्ये नवेगावबांध येथे समाधान हॉटेल ते रुपेश कापगते यांच्या घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम, कान्होली येथे कुमार दोनोडे ते कैलास हेमने यांच्या घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम, नाग मंदिर जवळ सभामंडप, जांभळी/ए येथे जि.प. शाळे पासून ते सदाशिव पुस्तोडे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम, बाराभाटी येथे सदाशिव चुलपार ते योगेश चाकाटे यांच्या घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम तसेच दिनेश जोशी ते हरी आंद्रे यांच्या घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम असे एकूण ५० लक्ष रुपयाचे कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी होमराज पुस्तोडे, उपसभापती पंचायत समिती अर्जुनी मोरगाव, हिराताई पंधरे सरपंच नवेगावबांध, रमण डोंगरवार उपसरपंच नवेगावबांध, गणेश ताराम सरपंच जांभळी, अनिल पुस्तोडे उपसरपंच जांभळी, छायाताई आमले सरपंच कान्होली, जागेश्वर मध्ये उपसरपंच कान्होली, महादेव प्रधान सरपंच बारभाटी, किशोर बेलखोडे उपसरपंच, राकेश पहिरे, संपत बनसोड, डीलेश्वरी वाघमारे, सरस्वती चाकाटे, श्रावणजी मेंढे, प्रेमदास तिरपुडे, पितांबर काशीवार, परेश उजवणे, सुरेखाताई येडाम, लीलाधर काशिवार , श्रीराम ताराम, बुधराम कोरे, कैलास हेमने, चक्रधर हेमने, सतीश वाढई, रतिराम कुंभरे, जितेंद्र कापगते, नीलकंड भोयर, नरेश हुमे, हेमलता गावड, अनिल रुखमोडे, नामदेव डोंगरवार, आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते.